12 SEP 2022 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आय विटनेस दुर्मीळ शॅमेलियॉन सरडा विद्यापीठात!



रंग बदलणारा हा दुर्मीळ शॅमेलियॉन सरडा कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठ परिसरात रविवारी सकाळी फिरणाऱ्या काही लोकांना संगीत नाट्य विभागाजवळ दिसला. त्यांनी वन्यजीवप्रेमी शरद जाधव, आशुतोष सूर्यवंशी व विनय शेटे यांना सांगितले. नंतर करवीरचे वनक्षेत्रपाल आर. एस. कांबळे यांच्या मार्गदर्शनानुसार, या सरड्याला रेस्क्यू करून तत्काळ राधानगरी अभयारण्यात सोडण्यात आले. (छाया : आदित्य वेल्हाळ)

लोकमत

# आजपासून 'स्तुति'अंतर्गत वैज्ञानिक प्रशिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या स्तुति (Synergistic Training program Utilizing the Scientific and Technological Infrastructure) या विशेष प्रशिक्षण उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरण सुविधा केंद्राला सुमारे अडीच कोटींचा प्रकल्प मंजूर झाला आहे. याअंतर्गत विद्यापीठात आज, सोमवार ते रविवार (दि. १८) दरम्यान विद्यार्थ्यांना वैज्ञानिक प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती समन्वयक आणि शास्त्रज्ञ प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी दिली.स्तुति कार्यक्रम सुरू करण्यामागचा हेतू मानवी संसाधन तयार करणे, व पायाभूत सुविधांच्या पुरवठ्याचे विस्तृतीकरण करून देशभरात ज्ञान क्षमता वाढविणे असा आहे. विद्यापीठातील सॅफ डीएसटी सेंटरमध्ये सोमवारी सकाळी साडेदहा वाजता उद्घाटन होईल. यावेळी संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. अरुण पाटील, दिल्लीतील तंत्रज्ञान विभागाच्या शास्त्रज्ञ सुचिता लोखंडे प्रमुख उपस्थित असतील, तर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील असतील, अशी माहिती प्रा. सोनकवडे यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठाचे ३५६ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्र परीक्षेतंर्गत रविवारपर्यंत सुमारे ३५६ परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. उन्हाळी सत्रांतर्गत ५६१परीक्षा एमसीक्यू ऑफलाईन पद्धतीने सुरळीतपणे पार पडल्या. रविवारी बीए (डिफेन्स स्टडी), बी. व्होक. (टुरिझम अँड सर्व्हिस इंडस्ट्री), एम. ए. (इंग्रजी), ५ वर्षे एलएलबी आदी परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत.

पुढारी

# 'नॅनोसायन्स'च्या विद्यार्थिनींची पीएच. डी.साठी निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागातील प्राजक्ता गायकवाड (रा. कराड), सुप्रभा दीक्षित (रा. सैदापूर, कराड) व ऐश्वर्या पाटील (रा. कोल्हापूर) यांची महिंद्रा विद्यापीठ, हैदराबाद येथे पीएच. डी.साठी निवड झाली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ निवडणूक कार्यक्रम पुढील आठवड्यात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीचा कार्यक्रम पुढील आठवड्यात जाहीर होण्याचीशक्यता आहे. विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच मतदार नोंदणीत तीनपटीने वाढ झाली आहे. त्यामुळे विद्यापीठ निवडणूक चुरशीने होण्याची चिन्हे आहेत.

विद्यापीठ निवडणुकीसाठी जुलै अखेरीस मतदार नोंदणी संपली आहे. यंदा ४९ हजार ९३९ पदवीधर मतदारांनी नावनोंदणी केली. शिक्षक २०८, महाविद्यालये २७७, विभागप्रमुख १९५, महाविद्यालय प्राचार्यांची आणि ११८ व्यवस्थापन प्रतिनिधींनी नावनोंदणी केली आहे. विद्यापीठ निवडणूक प्रक्रियेतील पदवीधर मतदार नोंदणीचा पहिला टप्पा संपला आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर



विद्यार्थी संघटना, शिक्षण संस्था, प्राध्यापक संघटनांनी बैठका घेऊन निवडणुकीची रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये विद्यापीठातील विविध पदांसाठी निवडणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या आठवड्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर निवडणुकांच्या प्रचारास सुरुवात होईल. विद्यापीठ विकास आघाडी, विद्यापीठ विकास मंच यांची काय भूमिका राहणार, याकडे विद्यापीठ वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

पुढारी

# आजपासून सातदिवसीय रहिवासी कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारत सरकार विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय, शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने स्तुती (सिनरजिस्टीक ट्रेनिंग प्रोग्राम अँड टेक्नॉलॉजिकल इन्फ्रास्ट्रक्चर) अंतर्गत सोमवार (दि. १२) पासून सातदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेस प्रारंभ होणार आहे.

कार्यशाळेस प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, मिनिस्ट्री ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, न्यू दिल्लीच्या संशोधक डॉ. सुचिता लोखंडे व प्रमुख अतिथी म्हणून संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. अरुण पाटील उपस्थित राहणार आहेत. कार्यशाळेत देशभरातील संशोधक, विद्यार्थी, शास्त्रीय व तंत्रज्ञान क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करतील, अशी माहिती सैफ डीएसटी सेंटर विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी दिली.

पुण्यनगरी

# 'नॅनोसायन्स'च्या विद्यार्थिनींची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागातील तीन विद्यार्थिनी प्राजक्ता नरेंद्र गायकवाड, सुप्रभा सुरेश दीक्षित आणि ऐश्वर्या राजगोंडा पाटील यांची महिंद्रा विद्यापीठ, हैदराबाद येथे पीएच.डी.साठी निवड झाली आहे. ऐश्वर्याने २०२०-२१ मध्ये, तर प्राजक्ता आणि सुप्रभा यांनी २०२१-२२ मध्ये बी. एस्सी.,एम.एस्सी. नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी (५ वर्षांचा एकात्मिक) अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाचे प्रभारी संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# स्टार्टअपमधून चौदा प्रस्ताव राज्य शासनाकडे

- शिवाजी विद्यापीठातील सेक्शन-८ कंपनीकडील नोंदीत नवसंकल्पना प्रत्यक्षात उतरणार
- व्यवसायासाठी राज्य सरकारसह विद्यापीठ सर्वोतोपरी मदत करणार



**विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भर व्हावे, यासाठी त्यांच्या संकल्पनांना व नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने स्टार्टअप सुरू केले आहे. शिवाजी विद्यापीठात सेक्शन -८ कंपनी सुरू केली असून यातून अनेक संशोधकांना पेटंटसह कंपनीची स्थापना करून दिली जाईल. सध्या विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक व समाजातील अनेक घटकांनी १४ संशोधनाचे प्रस्ताव पाठवले आहेत. या प्रस्तावांना तज्ज्ञांची मान्यता मिळाली असून, त्यांची स्वत:ची कंपनी किंवा पेटंट नोंदणीसाठी हे प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवले आहेत. विद्यापीठातील स्टार्टअपमधून अनेकजण आत्मनिर्भर बनतीलच पण इतरांनाही रोजगार उपलब्ध करून देतील, ही गोष्ट विद्यापीठाच्या दृष्टीने गौरवास्पद आहे.**

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ, महाविद्यालय आणि समाजातील अनेकांकडे भरपूर संकल्पना असतात. परंतु, या संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी त्यांना व्यासपीठ व आर्थिक मदत मिळत नाही. या संकल्पनांना व्यासपीठ व निधी उपलब्ध करून देण्याचे काम विद्यापीठ स्टार्टअपच्या माध्यमातून करताना दिसत आहे. स्टार्टअपच्या माध्यमातून मुग्धा सावंत यांनी कॅफेन फ्री कॉफी: डिकॅप बनवले आहे. शरीराला घातक असणारे कॉफीतील कॅफेन बाजूला काढले आहे. त्यामुळे शरीरावर होणारे दुष्परिणाम होणार नाहीत. तसेच विश्वजीत खाडे यांनी ऑर्डिनो स्टेल हे एक इलेक्ट्रॉनिक उपकरण तयार केले आहे. यातून हार्डवेअर कनेक्टीविटी, मॉनिटरिंग प्रयोग, हार्डवेअर स्टेटस मॉनिटरिंग कंट्रोल करता येते. डॉ. चिराग नारायण यांनी 'शिवतेज ऑईल' सांधेदुखीवरील हर्बल तेल तयार केले आहे. हे तेल हाडे व सांधे विकारावर आयुर्वेदिक दिर्घकालीन उपाय आहे. डॉ. सुप्रिया कुसाळे यांनी बॉयोफर्टीलायझर उत्पादन केले आहे. सेंद्रीय शेतीला पूरक 'सूर्या ॲग्रो बायोटिक' कंपनी स्थापन करून सूक्ष्मजीवांपासून जैविक खत तयार केले आहे. संग्राम पाटील यांनी ऊस लावणी यंत्र तयार केले असून, या यंत्राच्या सहाय्याने सरीतील व रोपातील अंतर योग्य ठेवून ऊसलावणी करता येते. डॉ. सागर डेळेकर यांनी ॲन्टीबॅक्टेरीयल पेंट तयार केला आहे. याचा उपयोग हॉस्पिटल आणि क्लिनिकमध्ये करता येतो. त्यांनी पेटंटसाठी प्रस्ताव सरकारकडे पाठवला आहे. धनंजय वडेर यांनी आरोग्यदायी 'बदाम थंडाई' तयार केली आहे. बध्दकोष्ठता नियंत्रण, पचनक्रिया वाढतेच पण रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. श्रीनिवास कुंभार यांनी 'शनी ऑपरेटिंग सिस्टम' तयार केली आहे. भविष्यात अनेक संस्था या सिस्टमचा वापर करण्याची शक्यता आहे. दिग्विजय आजरेकर यांनी 'अल्ट्रा' नेब्युलायझर तयार केले आहे. दम्यासह फुफुसांचा आजार असणाऱ्यांना वाफ घेण्यासाठी ही मशिन उपयोगी पडणार आहे. याला लाईटची गरज भासणार नसून मोबाईलवर ऑपरेट करता येईल. राजवर्धन शिंदे यांनी शरीराच्या स्कॅनिंगसाठी थ्रीडी ॲप तयार केले आहे. यासह अन्य संशोधकांनी आपले प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवले आहेत. राज्य शासनाची मान्यता मिळाल्यास या संशोधकांच्या नवसंकल्पना प्रत्यक्षात पेटंट किंवा कंपनीच्या स्वरूपात नावारूपाला येतील. यातून हे संशोधक स्वत: आत्मनिर्भर बनतीलच परंतू अन्य दहाजणांना रोजगार उपलब्ध करून देतील.

### अनेकांना रोजगार मिळणार

महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत स्टार्टअप यात्रा राज्यभर फिरली. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर कोणाचीही नवसंकल्पना नोंदवता येते. ती समाजोपयोगी असल्यास व्यवसायासाठी मान्यता व आवश्यक साधने उपलब्ध करून दिली जातील. अडचणीतून मार्ग काढण्यासाठी नवसंकल्पनांची निर्मिती होते. यालाच व्यवसायाचे स्वरूप मिळेल.

### स्टार्टअप हब करण्याचा मानस

शिवाजी विद्यापीठातील इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून पश्चिम महाराष्ट्रात स्टार्टअप हब निर्माण करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. ज्यांच्या नवसंकल्पना आहेत त्यांना विद्यापीठ मदत करून, उद्योजक तयार करण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यासाठी समाजातील सर्वांनी आपल्या नवसंकल्पनेची विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर नोंद करावी.

**डॉ. एम. एस. देशमुख (संचालक, इनोव्हेशन इन्क्युबेशन ॲण्ड लिंकेजस)**

12 SEP 2022 तरूण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : ॲड. अशोक उपाध्ये यांच्या मातोश्री अनुसया उपाध्ये यांच्या शताब्दी वर्षानिमित्त त्यांचा सन्मान करताना डॉ. जे. एफ. पाटील. सोबत डॉ. विजय ककडे, एन. एन. पाटील (सांगवडेकर), संजय शेटे, सुरेश रोटे, अनिल पाटील, प्रा. संदीप पाटील, उद्योजक सुरेश जैन, ॲड. किरण महाजन आदी.

# महावीर अध्यासनास दहा हजारची देणगी

प्रतिनिधी

कोल्हापूर

ॲड. अशोक उपाध्ये यांनी त्यांच्या मातोश्री अनुसया उपाध्ये यांच्या शताब्दी वर्षपुर्ततेनिमित्त शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीच्या बांधकामासाठी दहा हजार रूपयांची देणगी दिली आहे. ही देणगी भगवान महावीर अध्यासनाचे डॉ. विजय ककडे यांचेकडे सुपूर्द केली. ॲड. अशोक उपाध्ये यांच्या कुटुंबियांचा भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महत्वाचा सहभाग होता. या त्यांच्या कार्याबद्दल भगवान महावीर अध्यासनातर्फे शाल, श्रीफळ व ग्रंथ देवून त्यांच्या मातोश्री यांचा सन्मान केला.

भगवान महावीर अध्यासनाच्या भव्य इमारत बांधकामास सर्व दानशूर, व्यक्ती, संस्थांनी सढळ हाताने मदत करावी, असे आवाहन डॉ. ककडे यांनी केले आहे. ही देणगी आयकर सवलतीस १०० टक्के पात्र आहे. यावेळी भगवान महावीर अध्यासन निधी संकलन अध्यक्ष व अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, देणगीदार एन. एन. पाटील (सांगवडेकर), कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे, दिगंबर जैन बोर्डिंगचे सुरेश रोटे, अनिल पाटील, प्रा. संदीप पाटील, उद्योजक सुरेश जैन, ॲड. किरण महाजन आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# सैफ डीएसटी सेंटरतर्फे आयोजित कार्यशाळेचे आज उद्घाटन

**कोल्हापूर :** विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय, भारत सरकार व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने स्तुति (सिनरजिस्टिक ट्रेनिंग प्रोग्रॅम अँड टेक्नॉलॉजिकल इन्फ्रास्ट्रक्चर) या सात दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमास आज (दि. १२) पासून शिवाजी विद्यापीठ येथे सुरुवात होणार आहे.

सैफ डीएसटी सेंटरतर्फे रहिवासी कार्यशाळेचे आयोजन केले आहे. केंद्र सरकारच्या 'विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या" निधीद्वारे विभागातील उच्च वैज्ञानिक आणि तांत्रिक पायाभूत सुविधा औद्योगिक क्षेत्रापर्यंत पोहोचाव्या हा या कार्यशाळेचा उद्देश आहे. या कार्यशाळेत देशभरातील संशोधक, विद्यार्थी, शास्त्रीय आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी विविध उपकरणांवर व्याख्याने, उपकरणे वापरण्यासाठी उपयुक्त असे अनुभवात्मक मार्गदर्शन होईल. विद्यापीठातील शैक्षणिक, विश्लेषण सुविधा आणि कौशल्याचा अभाव यामधील अंतर कमी करण्यासाठी हि कार्यशाळा नक्कीच उपयोगी होईल. प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी मिनिस्ट्री ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी न्यू दिल्लीच्या संशोधक डॉ. सुचिता लोखंडे तर प्रमुख पाहुणे म्हणून संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. अरुण पाटील उपस्थित राहणार आहेत. यापूर्वी डॉ. आर. जी. सोनकवडे यांच्या प्रयत्नामुळे स्तुतीचे पाच कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण झाले आहेत.

तरूण भारत

# नॅनोसायन्सच्या विद्यार्थीनींची महिंद्रा विद्यापीठात पीएच. डी. साठी निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागातील तीन विद्यार्थिनी प्राजक्ता गायकवाड (रा. कराड), सुप्रभा दीक्षित (रा. सैदापूर, कराड) आणि ऐश्वर्या पाटील (रा. कोल्हापूर) यांची हैद्राबाद येथील महिंद्रा विद्यापीठात पीएच. डी.साठी निवड झाली आहे. ऐश्वर्या यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये तर प्राजक्ता आणि सुप्रभा यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये बी. एस्सी.-एम.एस्सी. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी (५ वर्षांचा एकात्मिक) अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी संचालक डॉ. किरणकुमार शर्मा आदींनी त्यांना शुभेच्छा दिल्या.


प्राजक्ता गायकवाड


सुप्रभा दीक्षित


ऐश्वर्या पाटील

तरुण भारत

# विद्यापीठ निवडणूक कार्यक्रम आठवड्यात जाहीर होणार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ निवडणूक प्रक्रिया पदवीधर मतदार नोंदणीपासून सुरू झाली. जुलैअखेरीस मतदार नोंदणीची मुदत संपली असून, यंदा ४९ हजार ९३९ पदवीधर मतदारांनी नावनोंदणी केली. तसेच शिक्षक २०८, महाविद्यालय २७७, विभागप्रमुख १९५, महाविद्यालय प्राचार्यांची आणि ११८ व्यवस्थापन प्रतिनिधींची नावनोंदणी केली आहे. विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच यंदा मतदारनोंदणीत तीपटीने वाढ झाली. परिणामी विद्यापीठ निवडणूक चुरशीने होणार यात शंका नाही. येत्या आठवड्यात विद्यापीठ निवडणूक कार्यक्रम जाहीर होणार आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या अधिकृत सुत्रांनी दिली.

- **यंदा प्रथमच ४९ हजार ९३९ पदवीधर मतदारांनी केली नोंदणी**

शिवाजी विद्यापीठाची निवडणूक प्रक्रियेतील पदवीधर मतदार नोंदणीचा पहिला टप्पा संपला आहे. पदवीधर मतदार अर्जांची छाननी प्रक्रिया सुरू आहे. संघटनांनी आपआपल्या पक्षाबरोबर बैठका घेवून निवडणूक कशी लढवायची यासंदर्भात चर्चा केली आहे. तसेच विद्यापीठ प्रशासन निवडणूक प्रक्रिया कधी जाहीर करणार याकडे सर्वांचे लक्षआहे. सर्व अधिकार मंडळांवर आपल्या संघटनेचे वर्चस्व असले पाहिजे असा निर्धार प्रत्येक संघटनांनी केला आहे. त्यादृष्टीने संघटनांचे नियोजन सुरु आहे. ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये विद्यापीठातील विविध पदांसाठी निवडणूक होण्याची शक्यता आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर प्रचाराला वेग येणार आहे. तसेच आपल्या संघटनेने कोणाबरोबर जायचे, अनेक संघटना एकत्र आल्या तर कोणाला किती जागा द्यायच्या याच्या वाटाघाटीसंदर्भात चर्चा सुरू आहेत.